आवेदनपत्रे भरू नयेत. याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल मंडळ कार्यालयात त्वरीत सादर करावा.

11) अंतिम योग्यता प्रमाणपत्रासाठी ज्या मंडळाचे उत्तीर्णता प्रमाणपत्र विलंबाने प्राप्त होणार असेल अशा परिस्थितीमध्ये संबंधित मंडळाचे तात्पुरते उत्तीर्णता प्रमाणपत्र (Provisional Passing Certificate) ग्राहय धरण्यात येईल.

**महत्वाचे :-**

12) ज्या विद्यार्थ्यांनी आवश्यक त्या कागदपत्राची पूर्तता केलेली नाही. अशा विद्यार्थ्यांचा इयत्ता 11 वी च्या परीक्षेचा निकाल कनिष्ठ महाविद्यालयाने जाहीर करू नये. तसेच अशा विद्यार्थ्यांना कोणत्याही परिस्थितीत इयत्ता 12 वी च्या वर्गात पुढील वर्षी प्रवेश देवू नये.

13) मंडळाकडे तयार असलेली अंतीम योग्यता प्रमाणपत्रे संबंधित कनिष्ठ महाविद्यालयाने तातडीने निर्धारित मुदतीमध्येच मंडळाकडून हस्तपोच अथवा समक्ष प्राप्त करून घ्यावेत. मंडळाकडून विलंबाने प्रमाणपत्रे प्राप्त केल्यामुळे होणा-या अडचणीस मंडळ जबाबदार राहणार नाही याची नोंद घ्यावी.

14) मंडळाने निर्धारित केलेल्या दिनांकानंतर कोणत्याही प्रकारचे योग्यता प्रमाणपत्राचे अर्ज किंवा त्या संदर्भातील कागदपत्रे स्विकारली जाणार नाहीत. तसेच **पोस्टाव्दारे प्राप्त झालेले योग्यता प्रमाणपत्राचे अर्ज किंवा कागदपत्रे मंडळातर्फे स्विकारली जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी. विभागीय मंडळाच्या सूचनांव्यतिरिक्त कनिष्ठ महाविद्यालयांनी नियमबाहय कृती केल्यास रूपये 1000 /– दंड आकारण्यात येईल.**

15) राज्याबाहेरील / देशाबाहेरील विद्यार्थी इ. 12 वी मध्ये प्रवेश घेण्यास इच्छूक असतील त्यांनी दि.15 सप्टेंबर पूर्वी प्राचार्यांमार्फत मंडळाकडे योग्यता प्रमाणपत्राकरिता अर्ज सादर करणे अनिवार्य राहील. मात्र विशेष परिस्थितीत पालकांची बदली 15 सप्टेंबर नंतर इतर राज्यामधून बदलून आल्याचा उचित पुरावा सादर केल्यास अशा विद्यार्थ्याकडून अनुक्रमांक 7 प्रमाणे विलंब शुल्क व अनुक्रमांक 8 प्रमाणे अतिविलंब शुल्क आकारून अर्ज स्विकारण्यात येतील.

16) इ.12 वीत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांकरिता कागदपत्राची पूर्तता करण्यासाठी अनुक्रमांक 9 प्रमाणे अंतिम तारीख राहील. या कालावधीत त्यांचेकडून पूर्तता न झाल्यास अनुक्रमांक 9 प्रमाणे दंड आकारण्यात येईल. सदर मुदतीत कागदपत्रांची पूर्तता न केल्यास त्यांचे परीक्षेचे आवेदनपत्र रद्द करण्यात येईल व त्यास लेखी परीक्षेपासून वंचित व्हावे लागेल. याबाबतची लेखी स्वरूपात विद्यार्थ्यास जाणीव करून देण्यात यावी. व त्याची नोंद दप्तरी जतन करून ठेवावी.

17) राज्याबाहेरील /देशाबाहेरील खाजगी विद्यार्थ्यांनी फार्म नं.17 सोबत योग्यता प्रमाणपत्राचा अर्ज सादर करणे अनिवार्य आहे.

18) राज्यमंडळ, पुणे, दिनांक 21 नोव्हेंबर 2006 च्या पत्र कमांक रा.मं. / परीक्षा–3 / 9691 अन्वये परराज्यातील खाजगी विद्यार्थ्यांना सुध्दा नोंदणी प्रमाणपत्र (Enrollment Certificate) घेतेवेळी त्यांच्या प्रमाणपत्राची पडताळणी करून योग्यता प्रमाणपत्र प्राप्त करणे आवश्यक आहे.

---